


RNI No. 6153/57

# समाचार
SAMACHAR




Volume - 74 | Issue- 284 | Marathi Daily | Saturday 25/7/2026 | Pages - 8 | Price- Rs. 3




# नावाप्रमाणेच ‘कुमार’!


गेल्या वर्षी विधानसभेच्या निवडणुकांदरम्यान नगर शहराच्या १९७८ सालच्या निवडणुकीसंदर्भात एक स्पेशल फीचर करायचे होते. ती नगर विधानसभा इतिहासातील एकमेव निवडणूक जिथे प्रमुख चारही उमेदवार उच्च शिक्षित होते, डॉ. कुमार सप्तर्षी, डॉ. ना.ज.पाऊलबुधे, प्रा.श्रीकांत बेडेकर आणि ॲड. नवनीतभाई बार्शीकर. ती निवडणूक जिंकली डॉ. कुमार सप्तर्षी यांनी आणि नगरला तरुण आणि उच्च शिक्षित आमदार मिळाला. ते फीचर लिहिताना डॉ.सप्तर्षी यांच्याशी दोन-तीन वेळा फोनवर बोलणं झालं. पहिल्यांदाच बोलत असलो तरीही बोलताना एकदाही असं कुठंच जाणवलं नाही की त्यांच्याशी पहिल्यांदाच बोलत आहे. त्यांनी १९७८ च्या निवडणुकीच्या अनेक आठवणी तर सांगितल्याच, पण नगरमधील अनेक व्यक्ती, घटना आणि वास्तूंची देखील आठवण काढली. ते शरीराने पुण्यात असले, तरीही मनाने नगरमध्येच असल्यासारखे वाटले. नुकतेच त्यांचे निधन झाले त्यानिमित्ताने त्यांच्या काही आठवणी...

डॉ. सप्तर्षी यांचे मूळ गाव कर्जत तालुक्यातील राशीन. त्यांचे वडील ब्रिटीशकाळात आरोग्यसेवेत होते. त्यांनी रुग्णसेवेसाठी मुद्दामहून खेडेगाव मागून घेतले. सबब त्यांची कर्जत तालुक्यातील खेड येथे नियुक्ती झाली. २१ ऑगस्ट रोजी तेथेच कुमार सप्तर्षी यांचा जन्म झाला. पुढे राशीन येथे त्यांच्या वडिलांची बदली झाली. त्यांचे प्राथमिक शिक्षण तेथेच झाले. नंतर नगरच्या सोसायटी हायस्कूल आणि अहमदनगर कॉलेज येथे त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण झाले. तेथून पी.पी. मेडिकल उत्तीर्ण झाल्यावर पुण्याच्या बी. जे. मेडिकल कॉलेजमधून त्यांनी एमबीबीएस केले. पुण्याच्या बी.जे.मेडिकल कॉलेजमध्ये त्यांची गाठ पडली डॉ. जब्बार पटेल, डॉ. अनिल अवचट, डॉ. अरुण लिमये, डॉ. बाबा आढाव आणि डॉ. दत्ता सामंत यांच्याशी. या सर्वांनी स्वतःला वैद्यकीय व्यवसायात न टाकता सामाजिक जीवनात स्वतःला वाहून घेतले.




विविध विशेष
ज्ञानेश कुलकर्णी

मुलाने आयएएस व्हावे ही पालकांची इच्छा; मात्र मुलाच्या अंगात असणारे हरहुन्नरी गुण त्यांना सरकारी चाकोरीत बसू देणार नव्हते. ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक रावसाहेब पटवर्धन त्यांच्या वडिलांचे मित्र. त्या अर्थाने ते त्यांचे जणू पालक होते. त्यांच्या सहवासात त्यांनी निस्सीम राष्ट्रभक्तीचे धडे गिरवले. पुढे ते एस. एम. जोशी यांच्या संपर्कात आले. तेथून त्यांच्या जीवनाची दिशाच बदलली. विद्यार्थीदशेत असतानाच त्यांना चळवळीचे बाळकडू मिळाले, ते एस. एम. जोशी यांच्यामुळे. त्यांनी १९७३ मध्ये एका कार्यक्रमात जातीव्यवस्थेच्या मुद्द्यावरून पुरीच्या शंकराचार्यांशी वादविवाद केला. हे प्रकरण तेव्हा देशभर गाजले होते. त्यांना समाजवादाकडे वळायला तो प्रसंग काही अंशी कारणीभूत होता, असे सांगितले जाते. तत्पूर्वी त्यांनी १९६५ मध्ये हिमालयात भटकंतीदेखील केली. (पान २ वर)



## उठाठेव

– विवेक मेहेत्रे



औषधं, पथ्यं, उपवास सारं करुन पाहिलं पण काही फरक नाही. म्हणून पुढच्या वर्षी चालत वारी करायचं ठरवतोय!!

### मोदींच्या कार्यकाळात आंदोलनातून मंत्र्यांचा पहिला राजीनामा

# अखेर सरकार झुकलं... धर्मेंद्र प्रधानांचा राजीनामा



**समाचार/नवी दिल्ली-दि.२५**

नीट परीक्षा पेपर फुटीच्या प्रकरणावरून गेल्या एका महिन्यापासून दिल्लीत कॉक्रोच जनता पार्टीचे आंदोलन सुरू आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी कॉक्रोच जनता पार्टीकडून करण्यात आली होती. याच मुद्यावरून पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचुक हे देखील बेमुदत उपोषणाला बसले होते. मात्र, २३ जुलै रोजी सोनम वांगचुक यांनी त्यांचे उपोषण सोडले. सोनम वांगचुक यांनी उपोषण सोडल्यानंतरही कॉक्रोच जनता पार्टीचे आंदोलन सुरूच राहणार असल्याची घोषणा अभिजीत दीपके यांनी केली होती.

कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनाला देशभरातून मोठा पाठिंबा मिळत होता. शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी कॉक्रोच जनता पार्टी आणि विद्यार्थी ठाम होते. कॉक्रोच जनता पार्टीच्या या आंदोलनाला (पान ३ वर)

### मुख्यमंत्री फडणवीस तातडीने दिल्लीला रवाना



केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला आहे. त्यानंतर आता घडामोडींना वेग आला असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे तातडीने दिल्लीला रवाना झाले आहेत.

### जंतर मंतरवर मोठा जल्लोष

कॉकरोच जनता पार्टी आणि जंतर मंतरवरील विद्यार्थ्यांनी धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेण्याच्या मागणीबाबत कोणतीही तडजोड करणार नाही, असा इशारा देत आंदोलन आणखी तीव्र करण्याची इशारा दिला होता. महिनाभरापासून जंतर मंतरवर आंदोलन सुरू होते. दिल्लीतील या आंदोलनाचे लोण मुंबई, राजस्थान, बिहार, गुवाहाटी अशा सर्वच राज्यांमध्ये पसरले होते. आज, दुपारी धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्यानंतर जंतर मंतरवर आंदोलनकर्त्यां विद्यार्थ्यांनी जल्लोष केला.

## निवडक



### कुशा मिसाईलची यशस्वी चाचणी

**नवी दिल्ली, दि.२५–** भारताची संरक्षण संस्था डीआरडीओने ओडिसातील एपीजे अब्दुल कलाम बेटावरून लांब पल्ल्याच्या कुशा सरफेस-टू-एअर मिसाईची यशस्वी उड्डाण चाचणी घेतली आहे. ही स्वदेशी क्षेपणास्त्र प्रणाली भारताची हवाई सुरक्षा अधिक मजबूत करेल. शत्रूची विमाने आणि क्षेपणास्त्रे हवेतच नष्ट करण्याची अफाट क्षमता या अत्याधुनिक मिसाइलमध्ये आहे. देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने भारताला आज मोठे यश मिळाले आहे. डीआरडीओने विकसित केलेल्या कुशा एअर डिफेन्स सिस्टीमची यशस्वी चाचणी पूर्ण झाली आहे. शत्रूच्या कोणत्याही लांब पल्ल्याच्या हवाई हल्ल्याला चोख प्रत्युत्तर देण्यासाठी हे क्षेपणास्त्र तयार करण्यात आले असून, यामुळे भारतीय लष्कराची ताकद आता अनेक पटींनी वाढली आहे. भारताने आपली संरक्षण यंत्रणा मजबूत करण्याच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकले आहे. या नवीन क्षेपणास्त्राच्या मदतीने भारत हवाई संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भर होईल.

### धारशिवच्या शेतकरी दाम्पत्याला महापूजेचा मान

# पंढरीत वैष्णवांच्या भक्तीचा महापूर



**समाचार/पंढरपूर-दि.२५**

आषाढी एकादशीनिमित्त संपूर्ण पंढरपूर नगरी भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाली असून, श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी लाखो भाविकांनी पंढरपूरमध्ये गर्दी केली आहे. राज्यभरातून आलेल्या वारकऱ्यांच्या ज्ञानोबा-तुकाराम आणि विठ्ठल विठ्ठलच्या अखंड जयघोषाने अवघी पंढरी दुमदुमून गेली आहे.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते श्री विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा विधिवत पार पडली. यंदा मुख्यमंत्र्यांसोबत महापूजेचा मान धाराशिव जिल्ह्यातील बाबासाहेब माने आणि प्रभावती माने या शेतकरी दाम्पत्याला मिळाला आहे.

कळंब तालुक्यातील गौरगाव येथील बाबासाहेब माने (वय ७०) हे शेतकरी असून ते गेल्या २० वर्षा पासून आळंदी- पंढरपूर पायी वारी करतात. यंदा ते आपल्या पत्नीसोबत वारीला आले. मध्यरात्री १२ वाजता दर्शन रांग बंद करण्यात आली. तेव्हा रांगेत प्रथम असलेल्या बाळासाहेब माने यांची समितीने मानाचे वारकरी म्हणून निवड केली. दरम्यान, आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर पंढरपूरमध्ये भाविकांची अभूतपूर्व (पान ३ वर)

### मुख्यमंत्र्यांचे विठुरायाला साकडे

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांच्या हस्ते पहाटे अडीच वाजता शासकीय महापूजा भक्तिमय आणि उत्साही वातावरणात पार पडली. विठुरायाच्या चरणी नतमस्तक होऊन मुख्यमंत्र्यांनी राज्यातील बळीराजाला सुखाचे दिवस यावेत, चांगला पाऊस व्हावा आणि संपूर्ण महाराष्ट्र सुजलाम् सुफलाम् व्हावा, अशी प्रार्थना केली.

